असा. क्र. १३ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, मार्च ३१, २००८/चैत्र ११, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.**—महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . . . . . १३०–१३२

दिनांक ३१ मार्च २००८ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ३१ मार्च २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

### महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

२००५ चा महा. ९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) या अधिनियमाची कलमे १ व ३ तात्काळ अंमलात येतील ; आणि कलम २ हे, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २९ मधील, पोट-कलम (८) मध्ये,— २००५ चा महा. ९.

(क) " २००० रुपये " आणि " रुपये दोन हजार " या मजकुराऐवजी " दहा हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " एक हजार रुपये " या मजकुराऐवजी " पाच हजार रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ९६ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९६ मध्ये, पोट-कलम (१) मधील खंड (क-१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (क-२) लायसनप्राप्त व्यापाऱ्याने, १ एप्रिल २००२ रोजी अथवा त्यानंतर सुरू होणाऱ्या आणि ३१ मार्च २००४ रोजी अथवा त्यापूर्वी समाप्त होणाऱ्या कोणत्याही वर्षाशी संबंधित सर्व विवरणपत्रे ३० सप्टेंबर २००४ रोजी अथवा त्यापूर्वी दाखल केली असतील आणि मुंबई मोटार स्पिरिट विक्री कराधान अधिनियम, १९५८ याच्या कलम ६ च्या पोट-कलम (३) किंवा (४) खालील निर्धारण आदेश ३१ मार्च २००८ पूर्वी काढण्यात आला नसेल तर, समाहारक ३१ मार्च २००९ पूर्वी तसा आदेश काढू शकेल ; १९५८ चा मुंबई ६६.

(क-३) लायसनप्राप्त व्यापाऱ्याने १ एप्रिल २००४ रोजी अथवा त्यानंतर सुरू होणाऱ्या आणि ३१ मार्च २००५ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाशी संबंधित सर्व विवरणपत्रे ३० सप्टेंबर २००५ रोजी अथवा त्यापूर्वी दाखल केली असतील आणि मुंबई मोटार स्पिरिट विक्री कराधान अधिनियम, १९५८ याच्या कलम ६ च्या पोट-कलम (३) किंवा (४) खालील निर्धारण आदेश ३१ मार्च २००८ पूर्वी काढण्यात आला नसेल तर, समाहारक ३१ मार्च २०१० पूर्वी तसा आदेश काढू शकेल ; १९५८ चा मुंबई ६६.

(क-४) १ एप्रिल २००२ रोजी अथवा त्यानंतर सुरू होणाऱ्या आणि ३१ मार्च २००४ रोजी समाप्त होणाऱ्या कोणत्याही कालावधीशी संबंधित विवरणांच्या बाबतीत, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ याच्या कलम ३३ च्या पोट-कलम (३) किंवा (४) खालील निर्धारण आदेश ३१ मार्च २००९ रोजी अथवा त्यापूर्वी काढता येईल ; आणि १ एप्रिल २००४ रोजी अथवा त्यानंतर सुरू होणाऱ्या कोणत्याही कालावधीशी संबंधित विवरणांच्या बाबतीत, उक्त कलम ३३ च्या पोट-कलम (३) किंवा (४) खालील निर्धारण आदेश ३१ मार्च २०१० रोजी अथवा त्यापूर्वी काढता येईल ;".

१९५९ चा मुंबई ५१.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

असा. क्र. १९ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, मार्च ३१, २००८/चैत्र ११, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Value Added Tax (Amendment) Act, 2008 (Mah. Act No. VIII of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. VIII OF 2008.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 31st March 2008).*

An Act further to amend the Maharashtra Value Added Tax Act, 2002.

Mah. IX of 2005. WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Value Added Tax Act, 2002, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Fifty-ninth Year of the Republic of India as follows :—

**Short title and commencement.** 1. (*1*) This Act may be called the Maharashtra Value Added Tax (Amendment) Act, 2008.

(*2*) Sections 1 and 3 shall come into force at once and section 2 shall come into force on such date, as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint.

Amendment of section 29 of Mah. IX of 2005.

**2.** In section 29 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (hereinafter referred to as "the principal Act"), in sub-section (*8*),— Mah. IX of 2005.

(*a*) for the words "rupees two thousand" at both the places where they occur, the words "rupees ten thousand" shall be substituted ;

(*b*) for the words "rupees one thousand" the words "rupees five thousand" shall be substituted.

Amendment of section 96 of Mah. IX of 2005.

**3.** In section 96 of the principal Act, in sub-section (*1*), after clause (*a-1*), the following clauses shall be inserted, namely :—

"(*a-2*) where all the statements pertaining to any year commencing on or after the 1st April 2002 and ending on or before the 31st March 2004, are filed by the licensed trader on or before the 30th September 2004 and an order of assessment under sub-section (*3*) or (*4*) of section 6 of the Bombay Sales of Motor Spirit Taxation Act, 1958, is not made before the 31st March 2008, the Collector may make such order of assessment before the 31st March 2009 ; Bom. LXVI of 1958.

(*a-3*) where all the statements pertaining to the year commencing on or after the 1st April 2004 and ending on the 31st March 2005, are filed by the licensed trader on or before the 30th September 2005 and an order of assessment under sub-section (*3*) or (*4*) of section 6 of the Bombay Sales of Motor Spirit Taxation Act, 1958, is not made before the 31st March 2008, the Collector may make such order of assessment before the 31st March 2010 ; Bom. LXVI of 1958.

(*a-4*) in respect of the returns relating to any period commencing on or after the 1st April 2002 and ending on the 31st March 2004, an order of assessment under sub-section (*3*) or (*4*) of section 33 of the Bombay Sales Tax Act, 1959 may be made on or before the 31st March 2009 ; and in respect of returns relating to any period commencing on or after the 1st April 2004, an order of assessment under sub-section (*3*) or (*4*) of the said section 33 may be made on or before the 31st March 2010 ;". Bom. LI of 1959.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई